## तिरके बाण

लेखक : डॉ. अ. वा. वर्टी

# पोषाखांचें युद्ध !

सोमय्या कॉलेजांतील पोषाखाचे युद्ध अखेरीस तडजोड होऊन मिटले. कॉलेजच्या चालकांचे म्हणणें होते की, भारतीय संस्कृतीच्या संरक्षणाकरतां मुलांच्या पॅंटचा खालचा घेर सोळा इंच असावा आणि मुलींचे स्कर्ट गुडघ्याखालीं एक इंचपर्यंत आले पाहिजेत. दहापंधरा दिवस हे इंचांचे युद्ध जोरांत चालले. त्यांत बिचाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना घेरावसुद्धां पडला. विद्यार्थ्यांनी आणि संस्थाचालकांनीं 'इंच इंच लढवूं'च्या आवेशांत युद्ध केले. पण अखेरीस तह झाला. मुलांना पॅंटचा खालचा घेर चौदा इंचांचा पाहिजे होता तो पंधरा इंच दोघांनीं मान्य केला. काटकुळ्या मुलांना आणखी कमी इंचाच्या घेरांची पॅंट घालण्याची परवानगी असावी, हे पोटकलमहि मान्य झाले. तसेच मुलींना स्कर्ट गुडघ्यावर एक इंच पाहिजे होता, तो गुडघ्यावर असावा असें ठरलें. विद्यार्थी आणि संस्थाचालक दोघेहि खूष झाले. आपलें पोषाखाच्या स्वातंत्र्याचें तत्त्व निम्म्या प्रमाणांत का होईना, मान्य झालें म्हणून विद्यार्थी खूष झाले, तर ह्या एका इंचामुळें भारतीय संस्कृतीवरचें संकट टळलें म्हणून संस्थाचालकहि खूष झाले.

सध्यां पोषाखाविषयीच्या बातम्या वर्तमानपत्रांतून गाजताहेत. खरे म्हणजे फार पूर्वीं जेव्हां अदाम आणि ईव्ह नंदनवनांत होते, तेव्हां अंजिराच्या पानांखेरीज त्यांच्याजवळ दुसरा कांहीं पोषाख नव्हता. उत्क्रांतीवादाप्रमाणें पाहिलें तर आपणा मानवाचे परात्पर पूर्वज जीं माकडें, तीं तर पूर्ण दिगंबरावस्थेंतच होतीं. अजूनहि आहेत. नंतर थंडीवाऱ्यापासून संरक्षण व्हावें म्हणून, माणसाची बुद्धी जसजशी विकास पावत गेली, तसतसा माणूस आपले शरीर झाकूं लागला. प्रथम तो झाडांच्या सालींपासून बनविलेली वल्कले वापरूं लागला. नंतर मेंढयांची लोकर कापून त्याची वस्त्रे बनवूं लागला. ह्याच सुमारास त्याला कापसाचा आणि रेशमाचा शोध लागला, आणि त्यांचेही कपडे बनवून तो वापरूं लागला. आतां तर रेयॉन नायलॉन टेरिलीनसारखे अनेक कृत्रिम धागे कपडे विणण्याकरता उपलब्ध झालेले आहेत.

माणसानें नैसर्गिक शक्तींपासून बचाव करण्याकरता म्हणून जरी वस्त्रप्रावरणास सुरुवात केलेली असली तरी नंतर लज्जारक्षण–विशेषत: स्त्रियांच्या बाबतींत–हा वस्त्रांचा प्रमुख हेतू मानला जाऊं लागला. त्यानंतर सौंदर्यवर्धनाकरता कपडयांच्या निरनिराळ्या फॅशन्स अस्तित्वात येऊं लागल्या. ह्याच अवधीत केव्हां तरी माणसाचे कपडे हे संस्कृतीचेही एक अंग बनले. जसे, बूटपाटलोण हे पाश्चात्य संस्कृतीचे, धोतर, पगडी, उपरणें हीं

## हल्ली आपली प्रतिष्ठा न्हावी आणि शिंप्याच्या हातांत

भारतीय संस्कृतीचें, तर किमोनोसारखे कपडे जपानी संस्कृतीचें लक्षण ठरलें. प्रत्यक धर्माचा, देशाचा, एवढेंच नव्हे तर जातीचादेखील एक विशिष्ट पोषाख ठरला. आणि पोषाख हें एक संस्कृतीचें प्रमुख लक्षण मानण्यांत येऊं लागलें. कांहीं लोक तर पोषाखांतच आपली संस्कृती आहे, असें मानूं लागले. साहेबाची संस्कृती बूटपाटलोणींत, मुसलमानी तुर्की टोपींत, तर हिंदूंची संस्कृती धोतरांत सामावलेली होती.

परंतु अलीकडच्या काळांत जग फार लहान झालें आहे. सर्वत्र औद्योगीकरण झपाटयानें होऊं लागलें आहे. आणि त्याला अधिक उपयुक्त

## पोशाखावरून आंतरराष्ट्रीय संबंधांत कटुतेचा संभव?

असा पाश्चात्य पोषाख साऱ्या जगांत झपाटयानें पसरूं लागला आहे. त्याचप्रमाणें पश्चिमेकडील नवनवीन अशा फॅशन्सहि आपल्याकडे येऊं लागल्या आहेत. केशरचनेंच्या आणि कपडयांच्या ह्या फॅशन्सना अलीकडे फार महत्त्व मिळूं लागलें आहे. इतकें कीं आजच्या माणसाची प्रतिष्ठा मुख्यत: शिंपी आणि न्हावी ह्यांच्या हातांत गलेली आहे.

पोषाखावरून सोमय्या कॉलेजसारखे तंटे आपल्याकडेच होतात, असे नाहीं. इतर देशांतहि पोषाखाच्या पद्धतीला अद्याप खूपच महत्त्व आहे. हे महत्त्व किती आहे, हे दाखविणारी एक बातमी सोमय्या प्रकरण गाजत असतांनाच वर्तमानपत्रांतून आली आहे. हा प्रकार आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा आहे. कदाचित् ह्या पोषाखाच्या प्रश्नावरून दोन देशांतील राजनतिक संबंधांत कटुता निर्माण होण्याचाहि संभव आहे.

प्रकार असा झाला. रुमानियाचे अध्यक्ष श्री. चिसेस्कू हे जपानला भेट देणार होते. सहाजिकच त्यांच्या सन्मनार्थ जपानचे बादशाहा हिरोहिटो एक जंगी खाना देणार होते. ह्या खान्याला सर्वांनी सायंकाळचा पोषाख घालूनच आले पाहिजे अशी अपेक्षा होती. परंतु रुमानिया हे कामगारांचे साम्यवादी राष्ट्र असल्यामुळें हा 'सायंकाळचा पोषाख' घालण्यास त्यांनीं नकार दिला. हा पोषाख सरंजामशाहीचा, बुर्ज्वा संस्कृतीचा अवशेष आहे, असा त्यांचा आक्षेप आहे. बऱ्याच वाटाघाटी झाल्या परंतु ह्या जटिल प्रश्नाची उकल होऊं शकली नाहीं. तेव्हां अखेरीस श्री. चिसेस्कूंनीं जपानची भेटच रद्द केली. ह्यावरून दिसून येईल कीं पोषाखाचा प्रश्न आपण समजतो तेवढा क्षुल्लक नाहीं.

विशेषत: दरबारी समारंभाच्या वेळीं पोषाखाचे नियम कटाक्षानें पाळण्यांत येतात. परंतु त्यांनाही मुरड घातल्याचें कांहीं प्रसंग आहेत. तीसपस्तीस वर्षांपूर्वी बॉकिंगहॅम राजवाडयांत त्या काळांतल्या सर्वांत मोठया साम्राज्याच्या सम्राटाला भेटायला महात्मा गांधी केवळ लुंगी नेसून आणि उपरणें पांघरून गेले होते. त्या वेळीं चर्चिलचा चडफडाट झाला होता आणि त्यानें म. गांधींचा 'अर्धनग्न फकीर' अशा शब्दांत उपहास केला होता. कामगारांच्या साम्यवादाच्या पीठावरील आद्य महंत लेनिननेंदेखील पोषाखाच्या बाबतींत अशी माघार घेतली होती. ब्रेस्ट लिट्वॉस्क येथें जर्मनांबरोबर तह करण्याकरतां त्यानें ट्रॉट्स्कीला पाठविलें होतें, तेव्हां 'हवें तर जर्मनांच्या इच्छेप्रमाणें संध्याकाळचा पोषाख घाल, पण एकदांची तहावर सही कर,' असा त्यानें ट्रॉट्स्कीला निरोप पाठविला होता.

आपण भारतीय एका बाबतींत सुखी आहोंत. आपला राष्ट्रीय असा पोषाख कांहीं ठरलेला नाहीं. ह्या भारतांत हजारो प्रकारचे पोषाख प्रचलित आहेत. आणि नाहीं म्हटलें तरी ते सर्वच 'राष्ट्रीय' पोषाख आहेत. आपल्या अशा एका 'राष्ट्रीय' पोषाखाची एक गंमतीची गोष्ट सांगतात.

आपले लोकनायक बापूजी अणे सिलोनमध्यें हायकमिशनर होते, तेव्हांची गोष्ट. तेथें त्यांची सर डॉन स्टिफेन सेनानायके ह्यांच्याशीं बरीच मैत्री जमली होती. दोघेहि एकमेकांकडे आधीं अपॉईंटमेंट न घेतां केव्हांहि जायचे. अणे सेनानायकेंकडे गेलेले असतील आणि जेवणाची वेळ असेल तर सेनानायके बापूजींना जेवायला ठेवून घेत. परंतु त्यापूर्वी ते बापूजींची परवानगी घेऊन आपल्या खोलींत जात आणि जेवणाचा 'संध्याकाळचा पोषाख' करून येत. एकदां सेनानायके बापूजींकडे आले असतांना जेवणाची वेळ झाली तेव्हां त्यांनीं सेनानायकेंना जेवणासाठीं ठेवून घेतले. मग 'जेवणाचा पोषाख' करण्याकरतां बापूजी सेनानायकेंची परवानगी घेऊन आतल्या खोलीत गेले. थोडयांच वेळांत ते बाहेर आले. ते आले ते उघडेबंब आणि सोवळे नेसून. ते उत्साहाच्या स्वरांत सेनानायकेंना म्हणाले "हा आम्हा हिन्दूंचा जेवणाचा 'पोषाख' आहे"

दरबारी पोषाखाविषयीचा प्रतिष्ठेचा फुगा बापूजींना किती खुबीनें फोडला? **

---

## शेती

लेखक : श्री. बाळ मस्कर

# परकीय चलन अधीक मिळवणारें– आलें!

आलें, ही वस्तू सर्वांच्या माहितीची आहे. वनस्पति शास्त्रीय दृष्टया, हे जमिनीत वाढणारे खोड आहे. याची रुचि तिखट असून बहुतेक देशांत आल्यांचा उपयोग अनेक कामासाठीं होतो.

### अनेक प्रकारे उपयोग

भारतांत प्रमुख लोणची, करी, सुपजिजर, ब्रेडपाव, यासाठीं त्याचा उपयोग करतात. परदेशांत आल्यांपासून जिजर ऑईल, जिजर इसेन्स, जिजर आलि ओप व जीन जरीन तयार करतात. आल्यांचा अधिक उपयोग खाण्यासाठीं करतात. आलें खाल्ल्यानें कातडीवरील सूक्ष्म छिद्रें रूंदावतात. कातडी गरम होतें. घाम येतो, आणि मग थंडगार वाटते.

### बेणें व लागवड

आल्यांचें बेणें दर हेक्टरी १२५० किलोग्रॅम लागते. प्रत्येक बेणें २८ ग्रॅम वजनाचें असतें. आल्यांचें बेणें एप्रिलच्या पहिल्या आठवडयांत पेरल्यास अधिक उत्पादन मिळूं शकते. पीकाच्या २ ओळीतील अंतर २५ सें. मी. व २ झाडांतील अंतर २० सें. मी. असावे. जमिनीत बेणें ४ सें. मी. खोल पेरावे. पिकांतील २ ओळींत हिरव्या पाल्याचा थर दिल्यानें अधिक फायदा होतो. पहिल्यांदा लावणीच्या वेळीं, नंतर दुसऱ्या महिन्यांत आणि तिसऱ्यांदा तिसऱ्या महिन्यांत, ओल्या पाल्याचा थर द्यावा. लावणीच्या वेळीं दर हेक्टरी ३७५ कि. ग्रॅम, सुपर फॉस्फेट, व १२५ कि. ग्रॅम, न्यूरिएट, आणि पोटॅशम, खते घ्यावी तसेंच ३ महिन्यांनीं १५० कि. अमोनियम सल्फेट, द्यावें. लावणी करतांना मूठभर शेणखत खड्डयांत टाकून त्यावर माती टाकली तर फायदा होतो. पानावरील ठिपके रोग निवारण्यासाठीं, पिकांवर ४–४–५० प्रमाणशीर बॉर्डो मिश्रण फवारावें. लावणीनंतर १५० दिवसनंतर काढणीस उशीर झाला तर आल्यांतील तंतूचें प्रमाण वाढतें. बेणें जमिनींत खड्डयांत सांठवून ठेवावें. त्यामुळें निरोगी स्थितींत रहातें. जमिनींतून काढलेलें हिरवें आलें, साफ करून त्याची पातळ साल काढतात व ऊन्हांत पसरून वाळवतात तीच सुंठ.

### सुंठ

हिरवें आलें टिकवून ठेवतां येत नाहीं. त्यासाठीं सुंठ तयार करावी लागते. व्यापारोदृष्टयां सुंठीला विशेष महत्त्व आहे. साल काढलेलें आलें चुन्याच्या आवणींत थोडावेळ घालतात व त्यांस गंधकाची धुरी देतात. अशी क्रिया तीन वेळां करून व नंतर पांढऱ्या रंगाचें आलें पुन्हा ऊन्हात वाळवून साफ करून ठेवतात नंतर ते विक्रीस येतें. यालाच सुंठ म्हणतात. महाराष्ट्रांत येथें बागायती केंद्रें उपलब्ध झालीत तेथें आल्याची लागवड करण्यास वाव आहे. मात्र चांगल्या जातीचें बेणें केरळांतून आणावें.

### चढाओढ

सुंठीच्या उत्पादनांत आपल्या देशाचा पहिला नंबर आहे. जागतिक बाजारपेठेंत भारतीय सुंठीचा हिस्सा ५० टक्के असतो. कोचीन जिजिर व कालिकत जिजिर, अशा दोन जाती भारतीय सुंठ म्हणून जागतिक बाजारांत प्रसिद्ध आहेत. भारतीय सुंठींत तंतूंचें प्रमाण जास्त असतें त्यामुळें अलीकडें जमेका, नायजेरिया देशांतील सुंठीस परदेशांत मागणी वाढली आहे. भारतीय सुंठीस मागणी कमी होत आहे. शिवाय, भारतीय सुंठीची किंमत इतर देशाच्या मानानें तीस टक्के अधिकच आहे. तेव्हां आल्याच्या नेहमींच्या जाती बदलून, अधिक उत्पादन देणाऱ्या व ततूंचें प्रमाण कमी असणाऱ्या जातीची लागवड केली पाहिजे.

### आल्याच्या जाती

केरळ राज्यांत घेतलेल्या आल्याच्या २७ जातीच्या चांचणी प्रयोगांत खालील पांच उत्तम जाती ठरल्या आहेत. आल्याच्या सर्व जातींत रियाड जानेश ही ब्राझील देशांतून आयात केलेली जात जास्त उत्पादन देणारी आढळली. दर हेक्टरी ४० हजार किलोग्रॅम उत्पादन मिळालें. पण सुंठीचें प्रमाण कमी म्हणजे १६·२५ टक्के पडलें. रियाड जानेश ही जात मूळचीच तेल (जिजिर ऑईल) व प्रॉलिजोर क्षीम करितां चांगली चायना जात, लोणच्यासाठीं उत्तम.

आपल्या देशांत बहुतेक राज्यांत आल्याचें उत्पादन होते. इ. सन १९६७।६८ मध्यें २२–२९ हजार हेक्टर जमिनींत आल्याची लागवड होती. उत्पादन १०–४० हजार टन झाले. या उत्पादनांत केरळचा वाटा ७० टक्के आहे. केरळ नंतर हिमाचल, ओरिसा, म्हैसूर, मध्यप्रदेश व बंगाल आणि आंध्रप्रदेश यांचा नंबर लागतो. फक्त आपल्या महाराष्ट्रांत तुरळक क्षत्रांत आल्याची लागवड होते.

### परकीय चलन मिळवून देणारे पीक

आल्याला परदेशांत बरीच मागणी आहे. मुंबई हे बंदर जवळ असल्यानें परदेशी निर्यातीसाठीं महाराष्ट्रांत आल्याच्या लागवडीचें क्षेत्र वाढविण्यास बराचसा वाव आहे. इ. सन १९६७।६८ मध्यें आपल्या देशांतून २,११६ टन आल्याची सुंठ परदेशी निर्यात झाली. त्यापासून (१ कोटी, २४ लाख, ७६ हजार रुपये) परदेशी चलन मिळाले. आपल्या देशांतून आल्याची निर्यात सौदी अरेबिया, अमेरिका, कॅनडा, जपान, आस्ट्रेलिया, सिलोन, सिंगापूर व मध्य पूर्वेतील सर्व देशांत होते. इ. सन १९६१ मध्यें देशांतून १ लाख पौंड आले अमेरिकेंत निर्यात झाले. त्याची किंमत ३४ हजार डॉलर मिळाली. **

---

प्रसिद्ध केलेल्या सर्वंच मतांशीं 'आपण' सहमत असतोच असें नाहीं.

आपण

संपादक : सत्यवान नामदेव सूर्यवंशी
सहसंपादक : सदाशिव पंढरीनाथ गायधनी
प्रकाशक : कृष्ण राघवन् पिले
मुद्रक : कृष्ण राघवन् पिले,
महाराष्ट्र प्रबोधन सेवामंडळ.
मुद्रणस्थळ : आपण मुद्रणालय, नासिक.
मालक : महाराष्ट्र प्रबोधन सेवामंडळ.

'आपण' कार्यालय,
शरणपूर,
नासिक - २.

'आपण' हें पत्र कृष्ण राघवन् पिले यांनीं आपण मुद्रणालय, शरणपूर, नासिक २, येथें छापून तेथेंच प्रसिद्ध केलें.